# कृषि पर्यटन धोरण

**प्रस्तावना-**

आजच्या धावपळीच्या जीवनात वैज्ञानिक युगामध्ये पर्यटनाला वेगळेच महत्व प्राप्त झालेले आहे. कित्येक देशामध्ये तसेच देशातील अनेक भागामध्ये ऐतिहासिक किल्ले, धरणे, पुरातन वास्तू यांचा उपयोग सध्या पर्यटनासाठी करण्यात येत आहे. परंतू आता ग्रामीण भागातील संस्कृती, निसर्ग, पशुपक्षी, ग्रामीण भागातील जीवनशैली ही शहरी भागामध्ये पहावयास मिळत नाही. त्यामुळे धावपळीच्या जीवनात विरंगूळा म्हणून शहरी भागातील जनता आता ग्रामीण भागातील या जीवनशैलीकडे पर्यटन म्हणून पाहू लागली आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी कृषि पर्यटन हा एक पुरक व्यवसाय म्हणून नावा रुपाला येऊ शकतो.

शहरी जीवनात दैनंदिन ताणतणाव कमी करण्यासाठी शहरातील नागरीक राज्याच्या विविध भागात शेतक-यांनी सुरु केलेल्या कृषि पर्यटनाला प्राधान्य देताना दिसत आहेत आणि त्यांची पावले आपोआपच ग्रामीण भागातील कृषि पर्यटनाकडे वळू लागली आहेत. ग्रामीण जीवन शैलीचे शिक्षण आणि करमणूक हे दोन्ही हेतू मनात ठेऊन कृषि पर्यटन साधणे शक्य आहे. शहरी भागातील नव्या पिढीला जुन्या ग्रामीण संस्कृतीची ओळख करुन देण्याबरोबरच खेड्यातील शेतकरी वर्गाला उत्पादन, रोजगार व अर्थसहाय्य मिळवून देण्याचा व्यापक दृष्टीकोन कृषि पर्यटन या संकल्पनेमध्ये आहे. शेती आणि पर्यटन यांना जोडणारा महत्वाचा दुवा म्हणजे कृषि पर्यटन होय.

कृषि व्यवसाय हा भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग असून महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांची तर शेती ही केवळ उपजीवीका नसून जीवनशैली आहे. राज्यातील सुमारे ५५ ते ६० टक्के लोक प्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहेत. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा विकास फलोत्पादन, दुग्धव्यवसाय, शेळी व मेंढी पालन, कुक्कुट पालन, रेशीम उद्योग, मधुमक्षिकापालन, मत्स्यव्यवसाय इ. कृषि संलग्न विषयाचा एकत्रित विचार करुन विकास घडवून आणल्यास ग्रामीण भागामध्ये कृषि पर्यटनाला निश्चितपणे चालना मिळू शकते. आजमितीस कृषि पर्यटन संदर्भात शासनाची कोणतीही स्वतंत्र योजना अस्तित्वात नाही. त्याकरिता फलोत्पादन तसेच इतर संलग्न विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना एकत्रित करुन शेतकऱ्यांना त्याचा लाभ दिल्यास ग्रामीण भागामध्ये कृषि पर्यटन केंद्र विकसित होणे सहज शक्य आहे.

त्याचबरोबर सध्या कृषि पर्यटनाची कोणतीही योजना अस्तिवात नसल्याने अनेक शेतकरी आपआपल्या कल्पना व सोयीनुसार कृषि पर्यटन राबवितांना आढळून येतात. या सर्वांना समान नियमांच्या छताखाली आणणे हे शासनाचे कर्तव्य ठरते व त्यातूनच पर्यटकांची योग्य सोय व सुरक्षा साधता येईल व त्यांना या माध्यमातून यथायोग्य मनोरंजन, विरंगुळा व समाधान लाभता येईल.

उपरोक्त ध्येय साधण्यासाठी शासनाचा पर्यटन विभाग कृषि पर्यटन योजना राबवू इच्छितो. महाराष्ट्र शासनाने दि.०४.०५.२०१६ च्या शासन निर्णयानुसार पर्यटनाचे नवे धोरण सुरु केले असून या धोरणाअंतर्गत पर्यटनक्षेत्रामध्ये वार्षिक १० टक्के उत्पन्नात व राज्याच्या सकल उत्पनात पर्यटन क्षेत्राचा १५ टक्के वाटा प्राप्त करण्याचे उद्दिष्टे ठेवले आहे. तसेच २०२५ पर्यंत १ दशलक्ष रोजगार निर्मिती करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. या बाबींची उदिष्ट गाठण्यासाठी कृषि पर्यटन धोरण राबविणे आवश्यक आहे. तसेच, याच धोरणांतर्गत ग्रामीण पर्यटन, कृषि पर्यटन ही योजना राबविण्याची संकल्पना समाविष्ट आहे.

## संकल्पना

गेली अनेक शतके भारताची संस्कृती ही जगामध्ये कृषि संस्कृती या रुपानेच ओळखली जाते. भारत हा कृषि प्रधान देश असून देशाच्या विकासामध्ये शेतीचा प्रमुख वाटा आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा विकास होण्यासाठी शेतीकडे व्यवसाय म्हणून बघणे गरजेचे झाले आहे. अनेकदा शेती उत्पादनाला कमी भाव मिळत असून शेतीसाठी लागणारा खर्च मात्र वाढत आहे. त्यामुळे शेतातून मिळणारे उत्पन्न हळूहळू कमी होत आहे. परिणामी काही जण नोकरीचा पर्याय धरु लागले आहेत. तर काही जण शेतजमीन विकून शहराच्या वाटेला लागले आहेत. अनेकदा शेतीमधून कमी उत्पन्न मिळत असल्याने शेतीस कंटाळून शेतकऱ्यांनी आत्महत्या देखील केल्या आहेत. शेतमालाला मिळणाऱ्या कमी अधिक भावामुळे शेतकऱ्याला निश्चित असे उत्पन्न मिळत नाही व यासाठी त्यास पुरक व्यवसायाची जोड देणे आवश्यक ठरते. शेतीच्या पारंपारिक पुरक व्यवसायाबरोबरच शाश्वत उपाय म्हणून कृषि पर्यटन हा एक पर्याय पुढे आला आहे. कृषि पर्यटनाच्या माध्यमातून शेतकरी आपली शेती फायदेशीर, किफायतशीर आणि प्रयोगशील करु शकतात. म्हणूनच आजच्या काळात शेतकऱ्यांना कृषि पर्यटना सारख्या व्यवसायाची संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

मोठया शहरातील वाढती वर्दळ, प्रदुषण आणि मानसिक ताण कमी करण्यासाठी अनेकांची पावले गावातील निसर्ग आणि शेतीतील शांत ठिकाणाकडे वळत आहेत. यातुनच कृषि पर्यटनांची संकल्पना पुढे आली आहे. कृषि पर्यटन हा पर्यटनाचा नवीन चेहरा आहे. कृषि पर्यटनातून ग्रामीण विकास आणि ग्रामीण विकासातून महाराष्ट्राचा विकास या ब्रीदवाक्याला साजेसे कृषि पर्यटन आहे. शिक्षण आणि करमणूक हे दोन्ही हेतू मनात ठेवून ते कृषि पर्यटनाकडे आकर्षित होत आहेत. कमीत कमी एक एकरामध्येही कृषि पर्यटन केंद्र उभारता येते. शहरी लोकांना आपल्या जुन्या संस्कृतीची ओळख करुन देण्याबरोबरच खेड्यातील शेतकरी वर्गाला उत्पन्न, रोजगार आणि आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याचा व्यापक दृष्टीकोन या कृषि पर्यटनाच्या उपक्रमामागे आहे. कृषि पर्यटनासाठी येणारे पर्यटक हे मुख्यत: अर्थार्जन मिळवून देतात. आपल्याकडे विविध प्रकारचे शेतकरी आहेत. त्यामुळे कृषि पर्यटनामध्ये वैविध्यता आढळून येते.

जगभरामध्ये मोठया प्रमाणात कृषि पर्यटनाच्या विकासामुळे लोकांचे जीवनमान उंचावत आहे. त्यामध्ये कॅलिफोर्निया, फिलीपाईन्स येथील डोंगराळ भागातील विविध प्रकारची शेती आणि बेटे, तैवान येथील चहाच्या बागा, शेतीबरोबर शांत एकाकीपणाच्या अनुभवासाटी स्पेन येथील मॅन्लोर्का, हवाई बेटे, इटलीतील स्थानिक ग्रामीण जीवन जगण्याचा अनुभव घेण्यासाठी तुर्कांनी हे युरोपातील महत्वाचे ठिकाण, ब्राझील येथील कृषि व कृषि पूरक उद्योगांची मांदियाळी, ग्रेनाडा ते कॅरेबियन बेटापैकी लहान बेट यांचा समावेश होतो.

कृषि पर्यटन हा जगातील अतिशय वेगाने वृध्दींगत होणारा व्यवसाय ठरत आहे. सर्व निरनिराळया उद्योगांच्या तुलनेत कृषि पर्यटन हा एकमेव उद्योग पर्यावरणपूरक असून शेती आणि शेतीशी निगडित आहे, आणि शेतीचा पूरक व्यवसाय म्हणून स्विकारल्यास, आहे त्या पायाभूत सुविधांचा वापर करुन अधिक फायदेशीर ठरत आहे. वाढत्या शहरीकरणामुळे लोकांचे जनजीनव अतिशय धावपळीचे आणि दगदगीचे झालेले आहे. रोजच्या धावपळीतून शांत, निवांत आणि निसर्गरम्य ठिकाणी जाण्याची ओढ प्रत्येकाच्या मनात असते आणि अशी वाटणारी ओढ आणि निसर्गाबद्दलचे प्रेम कृषि पर्यटनाचा मूळ पाया आहे. एखाद्या प्रदेशाचा आर्थिक विकास करण्याची क्षमता कृषि पर्यटनात आहे. सुनियोजित कृषि पर्यटनाचे अनेक फायदे आहेत. कृषि पर्यटनाला प्रोत्साहन दिल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष भरपूर फायदे होतील.

शेतामधील साधे आणि शांत घर, आजूबाजूला गायी, बैल, शेळया, मेंढया यांचा गोठा, मोठमोठी झाडे, पिकांचे विविध प्रकार, ताजी फळे, भाज्या, दूध, मध, ओंब्या, हरभऱ्याचा टहाळ इत्यादी आणि या सर्वांबरोबर स्वच्छता अशी माफक अपेक्षा कृषि पर्यटनाला गेलेल्या शहरवासियांची असते.

खेडयापाडयातील दुर्गम भागात विस्तारलेल्या शेतकऱ्यांमधील सृजनशीलता शोधणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे तसेच धावपळीला व कृत्रिम जीवनशैलीला उबगलेल्या शहरवासीयांना एखाद्या शेतकऱ्याच्या घरी जाऊन रहायचे आणि त्या शेतकऱ्यांनी त्यांचा स:शुल्क पाहुणचार करावयाचा, अशी कृषि पर्यटनाची मूळ संकल्पना आहे.

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षात शेतकऱ्यांची परिस्थिती खालावत चालली आहे. दलाल आधारित बाजारपेठ व्यवस्थेमुळे महाराष्ट्रातील शेतकरी त्रस्त असून शेती सोडण्याकडे कल वाढत चालला आहे. अशा काळात शासनाने कृषि पर्यटनाचा विकास केल्यास शेतीचा होणारा -हास टळू शकेल. ऑस्ट्रेलियासारख्या विकसित देशाच्या अर्थव्यवस्थेचा मूळ पायाच कृषि पर्यटन आहे. कृषि पर्यटनाचे महत्व लक्षात घेऊन महाराष्ट्राच्या विविध भागातील प्रगतशील शेतकरी कृषि पर्यटनाची संकल्पना राबवित आहेत आणि त्यांना पर्यटकांचा चांगला प्रतिसाद देखील मिळत आहे. कृषि पर्यटन हा व्यवसाय विकसित होताना शेतकऱ्यांना जास्त फायदा तर होतच आहे, या शिवाय ज्या गावामध्ये कृषि पर्यटन क्षेत्र सुरु झाले आहे त्या परिसरातील स्थानिक उद्योगांना देखील चांगलीच चालना मिळत आहे. गावात अनेकांना रोजगार मिळत आहे. शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ उपलब्ध होत आहे. हे सर्व घडत असताना सर्वात महत्वाचे म्हणजे पर्यटक जो ग्राहक आहे त्यास निसर्ग पर्यटनाचा खराखुरा आनंद मिळत आहे.

सध्या महाराष्ट्रात काही कृषि पर्यटन केंद्र कार्यरत आहेत. राज्यातील अनेक शेतकरी हा व्यवसाय नव्याने सुरु करावायाच्या विचारात आहेत. त्यामुळे नजीकच्या काळामध्ये आणखी कृषि पर्यटन केंद्रे सुरु होतील अशी अपेक्षा आहे. भारतातील महाराष्ट्र राज्य हे ***"कृषि पर्यटन"*** चळवळ सुरु करणारे पहिले राज्य आहे. आता ही चळवळ राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचत आहे. अशा वेळी राज्य शासनामार्फत कृषि पर्यटनास प्रोत्साहन देण्याची गरज आहे आणि त्यासाठीच कृषि पर्यटन धोरण ठरविण्यात आले आहे.

## कृषि पर्यटनाचा उद्देश :

१. कृषि पर्यटनातून ग्रामीण विकास आणि ग्रामीण विकासातून राज्याचा विकास साधणे

२. कृषि पर्यटनाच्या माध्यमातून शेती उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करुन देणे

३. कृषि पर्यटनाला कृषि पुरक व्यवसाय म्हणून प्रोत्साहन देणे

४. ग्रामीण भागातील लोककला आणि परंपरा शहरी भागात पोहोचविणे

५. ग्रामीण तरुणांना गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे.

६. ग्रामीण भागातील महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे.

७. शहरी भागातील लोकांना/विद्यार्थ्यांना शेती आणि शेती पध्दती तसेच कृषि संलग्न व्यवसाय यांची माहिती उपलब्ध करुन देणे.

८. कृषि पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील राहणीमान उंचावणे.

९. शहरी भागातील जनतेस प्रदुषणमुक्त, शांत व निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याचा अनुभव देणे.

१०. शेतावरील कृषि मालाच्या प्राथमिक प्रक्रियेस प्रोत्साहन देणे.

११. ग्रामीण भागातील पडीक, गायरान आणि क्षारपड जमिनी उपयोगात आणणे.

१२. पर्यटकांना प्रत्यक्ष शेतातील कामाचा अनुभव देणे.

### *कृषि पर्यटन खालील घटक सुरु करु शकतात :*

१. वैयक्तिक शेतकरी

२. कृषि सहकारी संस्था

३. शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था

४. अशासकीय संस्था

५. कृषि विज्ञान केंद्र

६. कृषि महाविद्यालये

७. कृषि विद्यापीठे

८. शेतक-यांनी स्थापन केलेली भागीदारी संस्था किंवा कंपनी

# कृषि पर्यटनासाठी बंधनकारक बाबी

**१. खेडेगाव :**

कृषि पर्यटन केंद्र हे शहराच्या हद्दीपासून किमान ५ कि.मी. बाहेर आणि शक्यतो खेडेगावामध्ये असावे.

२. **शेती :**

कृषि पर्यटन हे शेती आणि शेती संलग्न बाबींवरच आधारित असल्यामुळे शेती हा महत्वाचा घटक आहे. कृषि पर्यटन सुरु करण्यासाठी कोकण विभागाकरीता कमीतकमी १ एकर किंवा त्यापेक्षा जास्त व उर्वरीत महाराष्ट्राकरीता कमीत कमी ५ एकर व त्यापेक्षा जास्त शेती असणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी २४ तास पाण्याची सुविधा असणे आवश्यक आहे.

३. कृषि पर्यटन केंद्राअंतर्गत राहण्याकरीता उभारण्यात येणाऱ्या खोल्या ह्या RCC बांधकामात असू नयेत. सदरच्या खोल्या ह्या पर्यावरणपुरक असाव्यात. उदा. लाकूड, बांबू, जांभा दगड, झोपडी वजा असाव्यात.

४. कृषि पर्यटन केंद्राकरीता महिला बचत गटांना प्राधान्य देण्यात येईल.

**५. शेतकरी :**

पर्यटन केंद्र चालविणारी व्यक्ती ही स्वत: त्याच ठिकाणी शेती करणारा शेतकरी असावा तसेच सदर शेती त्याच्या स्वत:च्या अथवा त्याच्या कुटूंबातील सदस्याच्या नावे असणे आवश्यक आहे.

**६. पर्यटक निवास स्थान :**

पर्यटक निवासस्थान हे शेतीच्या ठिकाणीच असणे बंधनकारक आहे. जास्तीत जास्त ८ खोल्या असाव्यात. (प्रत्येक खोली किमान १५'x१०' आकाराची असावी) प्रत्येक खोलीस जोडलेले संडास, बाथरुम आवश्यक राहील. सदर पर्यटक निवासस्थानाचे बांधकाम हे शक्यतो पर्यावरणपूरक असावे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी आवश्यक आहे. शालेय सहलींसाठी अथवा मोठया समूहासाठी जास्तीत जास्त ०२ लोकनिवास (Dormitary) बांधता येतील. परंतू त्याकरीता किमान ५ एकर क्षेत्र असणे बंधनकारक राहील.

**७. भोजन कक्ष व स्वयंपाकघर :**

पर्यटक निवासस्थानाच्या ठिकाणी किमान २०'x१५' आकाराचे भोजनकक्ष असावे व त्यास संलग्न किमान १५'x१०' आकाराचे स्वयंपाकघर असावे.

८. कृषि पर्यटन केंद्र चालविण्यासाठी पर्यटन संचालनालयाच्या नोंदणी प्रमाणपत्र घेणे तसेच आवश्यक त्या इतर सर्व विभागांच्या परवानग्या घेणे बंधनकारक राहील.

९. अति तात्काळ वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्यासाठी फस्ट एड बॉक्स (First Aid Box) पर्यटन केंद्राच्या ठिकाणी ठेवण्यात यावा.

**आदर्श पर्यटन केंद्राकरीता इतर अनुषंगिक बाबी (ऐच्छिक बाबी)**

१. पर्यटन केंद्र हे शांत, सुंदर अशा ठिकाणी असावे. गर्द झाडी, नद्या, नाले आसपास असावेत.

२. **पर्यटन केंद्राच्या ठिकाणी एकाचवेळी विविध पिक पध्दतींचा अवलंब केला गेला असावा. जेणेकरुन पर्यटकांना अशा शेतीतील विविधतेचा अनुभव घेता येईल. उदा. अन्नधान्य, भाजीपाला, फळबागा, फुलशेती, रोपवाटीका इ.**

३. पर्यटन केंद्रावर घरगुती पध्दतीची रुचकर भोजन व्यवस्था असावी.

४. ग्रामीण जीवनाचा अनुभव देण्यासाठी बैलगाडी, घोडागाडी, शेतीवरील विविध हंगामातील कामे दाखविण्याची सोय असावी.

५. पर्यटन केंद्रावर ग्रामीण खेळ खेळण्याची सुविधा उपलब्ध करावी. उदा. विटीदांडू, हुतूतू, लंगडी, झोका इ.

६. पर्यटन केंद्रावर ग्रामीण व पारंपारिक मनोरंजन विषयक कार्यक्रमाची व्यवस्था असावी. उदा.पोवाडा, गोंधळ जागरण, गजेनृत्य, लेझिम, भजन-किर्तन, आदिवासी नृत्य इ.

७. पर्यटन केंद्राच्या परिसरात किल्ला, गिर्यारोहण, तलाव, नदी इ. निसर्गरम्य ठिकाणे असल्यास त्याबाबतचे मार्गदर्शन केंद्रचालकाने पर्यटकांना करावे.

८. शेतीमधील ताजा भाजीपाला, फळे, अन्नधान्य इ. माल पर्यटकांच्या विक्रीसाठी उपलब्ध करुन द्यावा.

९. कृषि पर्यटन केंद्राच्या ठिकाणी जाण्यासाठी सुस्थितीतील पोहोच रस्ता (approach road) असणे आवश्यक राहील. तसेच, पर्यटकांच्या वाहनासाठी वाहनतळाची व्यवस्था असावी.

- **कृषि पर्यटनाच्या व्यवसायातील संधी**

  १. स्थानिक हस्तकला
  २. शेती उत्पादनावरील प्रक्रिया व त्यांची विक्री
  ३. हरितगृह
  ४. दुग्धव्यवसाय
  ५. मत्स्यव्यवसाय
  ६. रोपवाटिका

७. कुक्कुटपालन व्यवसाय

८. शेळीपालन व्यवसाय

९. मेंढी पालन

१०. पशुपालन व्यवसाय

११. ग्रामीण फेरफटका/निसर्ग पर्यटन

१२. साहसी पर्यटन

## कृषि पर्यटनास शासनाकडून मिळणारे लाभ

१. कृषि पर्यटन केंद्र मालकास नोंदणी प्रमाणपत्राच्या आधारे बँक लोन प्राप्त करता येऊ शकेल.
२. जलसंधारण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या पाणलोट आधारीत योजना, शेततळे या सारख्या योजनांकरीता कृषि पर्यटन केंद्रास प्राधान्य देण्यात येईल.
३. नोंदणीकृत कृषि पर्यटन केंद्रास राज्य व केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या ग्रीन हाऊस फळबाग, भाजीपाला लागवड या सारख्या योजना उपलब्ध करुन दिल्या जातील.

**नोंदणी शुल्क** - कृषि पर्यटनाकरिता प्रथम नोदंणी करिता रु.२५००/- शुल्क असेल व नुतनीकरणाकरिता रु.१०००/- एवढे शुल्क राहील.

# पर्यटन संचालनालय

## पर्यटकांसाठी कृषी पर्यटन योजना

## कृषी पर्यटन योजनेअंतर्गत नोंदणी करावयाचा अर्ज व सत्यप्रतिज्ञा पत्र

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे संपूर्ण नांव | : | |
| २ | अर्जदाराचा संपूर्ण पत्ता<br><br>(दूरध्वनी/मोबाईल/ईमेल/वेबसाईट इ.) | : | |
| ३ | योजनेखाली कृषी पर्यटकांसाठी उपलब्ध होणाऱ्या पूर्ण भूखंडाचे वर्णन (गाव, नगरपालिका, जागेचे क्षेत्रफळ, खोल्यांची आणि खाटांची संख्या तसेच इतर सुविधा (प्रसाधनगृहे/ स्नानगृहे/दूरध्वनी इ.) | : | नमुना पृष्ठ क्र.१५ |
| ४ | अर्जदार क्र.३ नुसार कृषी पर्यटन योजनेसाठी उपलब्ध असलेल्या जागेचे अर्जदाराशी असलेले संबंध | : | मालक/एकत्र कुटुंबाचा सदस्य |
| ५ | अर्जदार कृषी पर्यटन स्थळी राहतात काय? | : | होय/नाही |
| ६ | प्रत्यक्ष कृषी पर्यटन चालविण्यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींची महत्वनुसार नोंद | : | घरमालकाची माहिती |
| ७ | अर्जदार कृषी पर्यटकांना त्यांच्या उपलब्ध जागेत कोणत्या प्रकारची सुविधा पुरवू शकेल त्याचे वर्णन (निवास, न्याहरी, जेवण (मागणी केल्यावर पुरविले जाणारे), २४ तास गरम पाणी | : | असल्यास अतिरिक्त सुविधाबाबतचा तपशील |
| ८ | उपलब्ध जागा केंव्हा बांधण्यात आली आणि जागेच्या बांधकामाची सुरक्षिततेच्या आणि सुविधेच्या दृष्टीकोनातून सद्य:स्थिती | : | सदरबाबत ग्रामपंचायतीचा दाखला/सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला<br><br>(नमुना पृष्ठ क्र. १३ ) |

# सत्यप्रतिज्ञा पत्र

मी सही करणार श्री. ------------------------------------------------------------
पत्ता : -------------------------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------------------------------------
-------------------------------------------------------------------------------------------------

दिनांक ------------------ रोजी आपल्याकडे कृषी पर्यटन योजनेत नोंदणीसाठी अर्ज केला आहे. मी त्यासोबत दिलेली माहिती खरी आहे. ही योजना राबविताना मी पर्यटकांसाठी सोय उपलब्ध करत आहे व त्यांना निवास, न्याहरी, भोजन व घरगुती खाद्यपदार्थ पर्यटकांना उपलब्ध करुन देईन तसेच पिण्यासाठी व वापरासाठी पाण्याची सोय करुन देईन. त्याचप्रमाणे झाडपूस करुन परिसर व खोल्या स्वच्छ ठेवणे, पर्यटकांची सुरक्षा, त्यांच्या संरक्षणाची आणि अर्जात नमूद केलेल्या सुविधा पुरविण्याची मी वेळोवेळी दक्षता घेईन.

मी खात्री देतो की माझ्या मालकीपत्रात नोंदविलेल्या व न नोंदविलेल्या भागीदार असलेल्यांची संमती घेऊन मी हा अर्ज करीत आहे. त्यांच्या बाबतीत कोणतीही तक्रार असल्यास, ती मिटवण्याची पूर्ण जबाबदारी माझी राहील. जर असे काही तंटे सुरु झाले व त्याचा पर्यटकांना त्रास झाला तर पर्यटन संचालनालय माझे प्रमाणपत्र रद्द करेल याची मला पूर्णपणे जाणीव आहे.

मी या जागेच्या सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता केली आहे व सर्व कर व विजेचे देयक वेळोवेळी भरत असतो.

(अर्जदाराचे नांव आणि स्वाक्षरी)

स्थळ :

दिनांक :

# कृषी पर्यटन योजनेअंतर्गत येणाऱ्या योजनाधारकांना ग्रामपंचायतीकडून निवास सुरक्षिततेबाबतचा दाखला (नमुना)

जावक क्र. दिनांक :

## निवास सुरक्षितता प्रमाणपत्र

श्री./श्रीमती ------------------------------------------------ राहणार मु.पो. ---------------

तालुका -------------------, जि. -------------------- यांनी दि. ----------------- रोजी दिलेल्या लेखी अर्जानुसार त्यांना त्यांचे राहते घर क्रमांक -------------- यात ---------- खोल्या असून त्यापैकी ---------- खोल्यांमध्ये महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्र. जीईएन्/१०९७/४१४/ प्र.क्र.३४/नवि-१४, दि.३ फेब्रुवारी, १९९७ व क्र. व्हीपीएम/१०९७/प्र.क्र.४०१/२२, दि.२७ मे, १९९८ मधील निर्देशानुसार पर्यटकांसाठी योजना राबविण्याकरीता निवासाच्या सुरक्षितता प्रमाणपत्र दाखल्याची मागणी केलेली आहे. सदर जागा पर्यटकांच्या निवासासाठी योग्य व सुरक्षित आहे अशी खात्री झाल्यावर त्यांना खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीवर पर्यटन संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या **"कृषी पर्यटकांसाठी योजनेकरीता ना हरकत दाखला"** देण्यांत येत आहे.

**अटी व शर्ती :**

उपायुक्त/मुख्याधिकारी/नगराध्यक्ष/सरपंच
(शिक्का व सही)

# पर्यटकांसाठी कृषी पर्यटन योजना : (खोल्यांचे अद्ययावत दरपत्रक)

१. कृषी पर्यटन केंद्राचे नाव

२. अर्जदाराचे नाव, घराचे नांव व संपूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक, ई-मेल इत्यादी. ---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

३. खोल्यांचे अद्ययावत दरपत्रक : दिनांक ---------- ते ---------- दिनांकापर्यंत

| खोली नंबर | खोलीचे क्षेत्रफळ | निवास सुविधा प्रकार (एसी/नॉन एसी) | कॉटची संख्या | व्यक्ती क्षमता | दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सीझन | ऑफ सीझन |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

एकूण खोल्या ( ) एकूण बिछाने ( ) चेक आऊट वेळ :

दिनांक :

# अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी संपर्क

| | |
|---|---|
| **नागपूर :**<br><br>उपसंचालक, पर्यटन संचालनालय | **अमरावती :**<br><br>उपसंचालक, पर्यटन संचालनालय |
| **औरंगाबाद :**<br><br>उपसंचालक, पर्यटन संचालनालय | **पुणे :**<br><br>उपसंचालक, पर्यटन संचालनालय |
| **नाशिक :**<br><br>उपसंचालक, पर्यटन संचालनालय | **कोकण भवन :**<br><br>उपसंचालक, पर्यटन संचालनालय |

# Check List of Facilities/Services Provided under Agro Tourism

| Sr. No | General | Facilities /Services Regarding the Establishment (Yes/No) | Remarks |
|---|---|---|---|
| | **Guest Room** | | |
| 1 | Well maintained and well equipped house and guest rooms with quality flooring, ,furniture, etc as per the traditional lifestyle. | (Yes/No) | |
| 2 | Guest Rooms:<br><br>Minimum One Lettable 8 room and maximum rooms. All rooms should be clean, airy, pest free, without dampness and with proper ventilation | (Yes/No) | |
| 3 | A Clean Change of Bed and Bath Linen | (Yes/No) | |
| 4 | Mattress should be minimum 10mm thick-coir, cotton, foam, spring. | (Yes/No) | |
| 5 | Sufficient Lighting/When electricity not there what kind of provision is made for lighting the room, at the time of electricity failure? | Details | |
| 6 | Clean Waste Paper Basket | (Yes/No) | |
| 7 | Minimum size of the bedroom 150 Sq. ft. including bathroom. | (Yes/No) | |
| 8 | Clean Drinking Water | (Yes/No) | |
| | **Bath Room** | | |
| 1 | Private bathrooms along with toiletries for each room. | (Yes/No) | |
| 2 | Indian/WC Toilet . It should be clean/odourless /with lid. | (Yes/No) | |
| 3 | Towel should be provided for each person. | (Yes/No) | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| 4 | 24 Hrs water supply facility | (Yes/No) | |
| 5 | Small water bucket in WC/and water. | (Yes/No) | |
| | **Public Area** | | |
| 1 | Dinning Facility (300 Sq. ft.) | (Yes/No) | |
| 2 | Sufficient Utensils (Crockery and Glassware). | (Yes/No) | |
| | **Kitchen** | | |
| 1 | Food prepared is veg or veg and non-veg | (Yes/No) | |
| 2 | Daily Germicidal Cleaning of floors. | (Yes/No) | |
| 3 | Clean Utensils | (Yes/No) | |
| 4 | Ventilation System | (Yes/No) | |
| 5 | Clean Drinking Water | (Yes/No) | |
| 6 | Sufficient Garbage Clearance Management in Kitchen (twice a day) | (Yes/No) | |
| 7 | Garbage Management in lettable rooms (once a day) | (Yes/No) | |
| 8 | Garbage Management in the premises (once a day). | (Yes/No) | |
| | **Miscellaneous** | | |
| 1 | Maintenance of register for guest check-in and check-out records including passport details in case of foreign tourists. | (Yes/No) | |
| 2 | First Aid Box | (Yes/No) | |
| 3 | Lockable Doors & Windows of Rooms and Bathrooms. | (Yes/No) | |
| 4 | Pesticide Done | (Yes/No) | |
| 5 | Is there relaxing open space | (Yes/No) | |

| | | | |
|---|---|---|---|
| | outside the rooms with sitting arrangements. | | |
| 6 | Is there a farm or garden around the rooms to enjoy the nature? | (Yes/No) | |
| 7 | Do you provide some special local cuisine on demand. | (Yes/No) | |
| 8 | Food is provided on demand or within specified time. | (Yes/No) | |

**Officer In-Charge**
**Dy. Director**
**-----------------**
**Directorate of Tourism.**

## नोंदणी पुस्तक छापण्याबाबतचा नमुना

# पर्यटन संचालनालय

**कृषी पर्यटन केंद्राचे नाव:**

| अ.क्र. | नाव व पत्ता | मोबाईल नंबर व ईमेल आयडी | खोली नं. | वाहन क्र. | ओळखपत्र | सही |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

# पर्यटन संचालनालय

## पर्यटकांसाठी कृषी पर्यटन योजना प्रमाणपत्र

नोंदणी क्रमांक ---------

कृषी पर्यटन नोंदणीधारक श्री / श्रीमती ---------------------- यांना "पर्यटकांसाठी कृषी पर्यटन" या योजनेअंतर्गत चालविण्याची परवानगी देण्यात येत आहे.

**प्रमाणपत्राची मुदत व तपशील पुढीलप्रमाणे**

कृषी पर्यटन केंद्राचे नाव व ठिकाण -------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

एकूण खोल्यांची संख्या (     ) खाटांची संख्या (     )

प्रथम प्रमाणपत्र मुदत वर्ष : दिनांक ------------- ते ----------------- पर्यंत

नुतनीकरण मुदत वर्ष : दिनांक ------------- ते ----------------- पर्यंत

दिनांक

शिक्का व अधिकृत स्वाक्षरी

पर्यटकांची सनद

- या ठिकाणी निवासाची सोय उपलब्ध होईल. त्यासाठी आवश्यक स्वच्छता व टापटीप, सुरक्षितता व वाजवी सुविधा आपल्याला मिळतील.
- टॉवेल/पंचा, बेडशिट स्वच्छ असेल व पर्यटकांच्या सूचनेनुसार बदलली जाईल.
- येथे चहा, न्याहरी, भोजनाची व्यवस्था होऊ शकेल. त्याचे दरपत्रक आपल्याला उपलब्ध केले जाईल.
- विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास उजेडाची पर्यायी व्यवस्था केली जाईल.
- पर्यटकांनी नोंदणी करताना ओळखपत्र दाखविणे आवश्यक आहे.
- स्नानासाठी गरम पाणी व वापरासाठी पाणी उपलब्ध असेल, पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळेल.
- आपली निवास व्यवस्था एका घरात होत आहे, आजूबाजूला वस्ती आहे याची जाणीव ठेऊन पर्यटकांनी योग्य वर्तन ठेवावे.
- राज्यात स्थापन झालेल्या आणि नोंदणी झालेल्या पर्यटन केंद्रांची पर्यटन विभागास आवश्यकता भासेल त्यावेळेस तपासणी करेल. सदर कृषी पर्यटन केंद्र पर्यटनाच्या मूळ संकल्पनेपासून दुर गेले असल्यास तसेच अनधिकृत बाबी आढळून आल्यास, आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. नोंदणी रद्द करण्याचा अधिकार पर्यटन संचालनालयास राहील. असे करण्यापूर्वी कृषी पर्यटन चालकाला पुरेशी संधी देण्यात येईल.
- कृषि पर्यटन प्रकल्पावर मद्यपान, ध्वनी प्रदुषण करणे तसेच इतर पर्यटकांना काही त्रास होईल असे वर्तन करणाऱ्या व्यक्ती विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याची मुभा कृषि पर्यटन केंद्र चालकास राहील.
- पर्यटकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी पर्यटन केंद्र चालकाची राहील परंतु अति साहस आणि गैरवर्तन या मुळे काही अपघात झाल्यास त्याची जबाबदारी कृषि पर्यटन केंद्र चालकाची / पर्यटन संचालनालयाची असणार नाही.

* * * * *